# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### 'महाज्योती' च्या नेट-सेट प्रशिक्षण निविदा मध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१) १३६६७ (२७-०६-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) मार्फत दिनांक २ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास नेट-सेट परीक्षेचे प्रशिक्षण देणाऱ्या शिकवणी संस्थेसाठी निविदा काढली असून ही निविदा काढण्याचे तांत्रिक काम देण्यात आलेल्या व्यक्तीची स्वत:ची शिकवणी संस्था असून त्याच संस्थेला नेट, सेट प्रशिक्षणाचे काम मिळावे अशा पध्दतीने अटी व शर्ती ठेवण्यात आल्याचा आरोप करणारे सविस्तर निवेदन अन्य संस्थानी मा. इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागासवर्गमंत्री, अध्यक्ष, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती आदीकडे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण देणाऱ्या धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंदणी झालेल्या संस्था, खासगी कंपन्या तसेच भागीदारी संस्थाचाही समावेश असून महाज्योतीच्या सदरहू निविदामध्ये संस्था नोंदणी प्रशिक्षण आणि त्यासाठी देण्यात येणाऱ्या गुणदानामध्ये फक्त कंपनी, दुकान कायदा आणि भागीदारी संस्था यांनाच गुण देण्याची अट घातली त्यामुळे राज्यात स्पर्धा परीक्षा प्रशस्तिपत्रक देणाऱ्या सार्वजनिक विश्वस्त कायद्यांतर्गत नोंदणी केलेल्या संस्थांना डावलण्यात आले असून, ज्यांनी निविदा काढली त्यांच्याच खासगी कंपनींना कंत्राट मिळावे असा आरोप इतर संस्थांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात राष्ट्रीय पात्रता परीक्षेसाठी नेट छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण संस्था (सारथी) आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्यामार्फत पी.एच.डी (संशोधन करणाऱ्या) २५० प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी प्रतिवर्षी अधिछात्रवृत्ती दिली जाते परंतु महाज्योती अंतर्गत २०० विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती दिली जात असून ओ.बी.सी., व्ही.जे.एन.टी., एस.बी.सी. प्रवर्गाची लोकसंख्या लक्षात घेता किमान ५०० विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती देण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सारथी, बार्टी आणि टीआयआरटीआय या प्रशिक्षण संस्थानी अशी अट टाकलेली नसताना 'महाज्योती' ने केलेल्या याप्रकारावर टीका होत आहे. राज्यात विविध समाजातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्थामध्ये प्रशिक्षण कार्यक्रमाच्या नावावर कोटयवधीचा भ्रष्टाचार करण्यासाठी निविदा काढणारा तांत्रिक विभाग, संबंधित अधिकारी आणि प्रशिक्षण संस्थाचे सर्वेसर्वा यांची एक साखळी मिळून हे काम करीत असल्याची तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास महाज्योती मार्फत नेट इच्छुक उमेदवारांना प्रशिक्षण देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदने दिली असून यूजीसी नेट अत्यंत महत्त्वाची परिक्षेसाठी प्रशिक्षण मिळाल्यास इतर मागास प्रवर्गाचे हित साध्य होणार असून सारथी संस्था देत असलेल्या परीक्षेच्या धर्तीवर महाज्योतीमार्फत प्रशिक्षण सुरू करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(६) असल्यास, सदरहू 'महाज्योती' च्या नेटसेट प्रशिक्षण निवेदेमध्ये झालेल्या गैरप्रकाराबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१७-०८-२०२२) :** (१) होय, एक तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे. त्याबाबत महाज्योतीमार्फत संबंधितास कळविण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही, महाज्योती मार्फत काढण्यात आलेल्या निविदेमध्ये प्रशिक्षण संस्था नोंदणी करीता देण्यात आलेले गुणदान सर्व प्रकारच्या संस्थाना देण्यात आलेले आहे. याबाबतचा स्पष्ट उल्लेख निविदेमधील तांत्रिक लिफाफा मध्ये करण्यात आला आहे.
(३) हे खरे नाही.

सन २०२१ या वर्षामध्ये ८५० विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. तसेच सन २०२२ या वर्षामध्ये २०० विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती मंजुरीबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन दिनांक ३०/०६/२०२२ पर्यंत १५३६ मुलांचे अर्ज प्राप्त झाले असून अर्जांची छाननी करुन विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती देण्याबाबत प्राप्त अर्जापैकी विद्यार्थ्यांची संख्या निश्चित बाबत महाज्योती च्या संचालक मंडळाच्या बैठकीत अंतिम निर्णय करण्यात येईल.
(४) हे खरे नाही.
(५) विद्यार्थ्यांना नेट-सेट परिक्षेचे प्रशिक्षण देण्याबाबत महाज्योती संस्थेच्या संचालक मंडळाच्या दिनांक २२/०४/२०२२ रोजी निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने दिनांक ०२/०५/२०२२ रोजीच्या बैठकीत ई-निविदा प्रसिध्द करुन युजीसी नेट-सेट परीक्षा बाबत मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षण संस्थाचे प्रस्ताव मागविण्यात आले आहे.
(६) महाज्योतीमार्फत तपासणी करण्यात आली असून, कोणताही गैरप्रकार झालेला नाही.

---

## महावितरणामार्फत ग्राहकांना देण्यात येत असलेली अतिरिक्त सुरक्षा ठेवीची स्वतंत्र बिले बंद करण्याबाबत

**(२) १३६८७ (२७-०६-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरणने माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान वीज देयकासोबत अतिरिक्त सुरक्षा ठेवीची स्वतंत्र देयके वीज ग्राहकांना पाठविली असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरणकडे अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम जमा न केल्यास ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वीज ग्राहकांनी वीज मीटर घेताना सुरक्षा ठेवीची रक्कम भरूनही प्रतिवर्षी महावितरणामार्फत लाखो रुपयांची वसुली केली जात असल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येऊन महावितरणाची सुरु असलेली वसुली रोखण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सामान्य जनतेची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन महावितरणने ग्राहकांकडून सिक्युरिटी डिपॉझिट घेणे बंद करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम २०२१ मधील कलम १३.६ नुसार वितरण परवाना धारकाला ग्राहकाकडे अतिरिक्त सुरक्षा ठेवीच्या रकमेची मागणी करता येते. त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्राहकांना महावितरणकडून नवीन वीज मीटर मिळत नसल्याबाबत

**(३) १३६८८ (२७-०६-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बहुतांश जिल्ह्यात विशेषत: कोकणात तसेच बदलापूर (ता.जि.ठाणे) येथे गत काही महिन्यांपासून वीज मीटरचा तुटवडा जाणवू लागला असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात तसेच कोकणात महावितरणकडून वीज मीटर मिळवण्यासाठी रितसर अर्ज करून व सुमारे २ लाख ग्राहकांनी मीटर मागणीचे शुल्क भरूनही वीज मीटरच्या कृत्रिम तुटवड्यामुळे सुमारे १० लाखांहून अधिक ग्राहकांना महावितरणकडून नवीन वीज कनेक्शन मिळाले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महावितरणच्या गोदामामध्ये हजारो वीज मीटर वापराविना पडून असल्याचे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून ग्राहकांच्या मीटर उपलब्ध नसल्याची सबब देवून खुल्या बाजारातून मीटर खरेदीस प्रवृत्त केल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर प्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई करुन राज्यातील ग्राहकांना वीज मीटर तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

महावितरणकडून ग्राहकांना मागणीप्रमाणे वीज मीटर देण्यात येऊन वीज पुरवठा केला जातो. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम २०२१ अन्वये ग्राहकांना खुल्या बाजारातून मीटर घेण्याची मुभा देण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेंतर्गत अल्पभूधारक शेतकऱ्यांना पीककर्जमुक्ती तसेच नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान वितरित करण्याबाबत

**(४) १३७०६ (२७-०६-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, डॉ.रणजित पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.राजहंस सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंदूभाई पटेल : तारांकित प्रश्न क्रमांक १२५८७ ला दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेंतर्गत अल्पभूधारक शेतकऱ्यांना दोन लक्ष रुपयांपर्यंत पीककर्जमुक्ती तसेच नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देता यावे यासाठी अर्थसंकल्पात १० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्याची घोषणा शासनाने मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी दिनांक ६ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास सहकार आयुक्त, पुणे यांनी राज्यातील सहकार विभागाच्या अधिकाऱ्यांना या योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत पत्राद्वारे कळविले असून पत्रात नमूद केलेल्या चुकीच्या निकषांमुळे राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांना योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागू नये यासाठी निकषांमध्ये तातडीने सुधारणा करण्याची मागणी राज्यातील शेतकरी, शेतकरी संघटना व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वे अभ्यास करुन शिफारस करण्यासाठी मा.उपमुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या उपसमितीच्या दिनांक १५ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आलेल्या बैठकीत शेतकऱ्यांना लाभ देण्यासंदर्भात आश्वासन देऊनही अद्याप राज्यातील एकाही शेतकऱ्याला प्रोत्साहनपर रकमेचा लाभ मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल तात्काळ प्राप्त होऊन थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी तसेच प्रोत्साहनपर अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१६-०८-२०२२) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे
(३) व (४) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत अल्पमुदत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये ५० हजार पर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याबाबत दिनांक २९ जुलै, २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानूसार प्रोत्साहनपर लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## श्री संत सत्यदेव बाबा प्राथमिक वि. ज. भ. ज. आश्रम शाळा, भारवाडी (ता.तिवसा. जि.अमरावती) येथील गैरव्यवहाराबाबत

**(५) १३७४४ (२८-०६-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री संत सत्यदेव बाबा प्राथमिक वि. ज. भ. ज. आश्रम शाळा भारवाडी, ता.तिवसा. जि.अमरावती येथील मुख्याध्यापिकेने कु. मनीषा सु उंद्रे यांच्या अधीक्षक पदावर कित्येक वर्षे हजर दर्शवून त्याची मान्यता मिळवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार संस्था, समाज कल्याण अधिकारी यांनी केल्याचे दिनांक २० मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २० मे, २०२० जा. क्र.१४२४ विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी याबाबतचा सविस्तर चौकशी अहवाल विभागीय समाज कल्याण अधिकारी अमरावती यांना सादर केला आहे, परंतु अद्याप याबाबत पुढे कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई करण्याची तसेच संस्थेच्या गैरव्यवहाराबाबत कार्यवाही करण्याची मागणी श्रीमती रोशनी रवींद्रराव कांडलकर, सुखाडी (ता.तिवसा, जि.अमरावती) यांनी शासनास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१३-०७-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

श्री संत सत्यदेव बाबा विजाभज प्राथमिक आश्रमशाळा, भारवाडी, ता.तिवसा,जि अमरावती या आश्रमशाळेतील कु.मनिषा सुरेश उंद्रे यांना वसतिगृह अधीक्षक पदावरील वेतन व भत्ते अदा करण्यामध्ये गैरव्यवहार झाल्याचे, श्री.सुरेश महादेवराव अमझरे यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, अमरावती यांनी चौकशी करून सादर केलेल्या दिनांक २०/०५/२०११ च्या तपासणी अहवालानुसार निदर्शनास येते.

(२) उक्त अहवालानुसार कु.मनिषा सुरेश उंद्रे, वसतिगृह अधीक्षक यांना सन २००० ते २००५ या कालावधीत अदा झालेली वेतन व भत्याची रक्कम रुपये २,३४,७५२/- संस्थेच्या सन २०२२-२०२३ चे तदर्थ अनुदानातून कपात करण्यात आली आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या आश्रमशाळांमधील विविध रिक्त पदे भरण्याबाबत

**(६) १३७४६ (२७-०६-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर : तारांकित प्रश्न क्रमांक ११८४१ ला दिनांक १० मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत चालवण्यात येणाऱ्या आश्रमशाळांमध्ये महिला अधीक्षिका, स्वयंपाकी, प्रयोगशाळा परिचर, शिक्षक ही महत्त्वाची पदे गत अनेक वर्षापासून रिक्त असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२२ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदे रिक्त असल्यामुळे आश्रम शाळेतील मुलांना अनेक मूलभूत सोई - सुविधा मिळत नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वित्त विभागाने दिनांक ४ मे, २०२० व दिनांक २१ जून, २०२१ रोजी निर्गमित केलेल्या शासननिर्णयान्वये शासनाच्या खर्चावर व पदभरतीवर निर्बंध लागू केले असून काही आश्रमशाळांमध्ये रिक्त असलेली स्वयंपाकी, पहारेकरी, वसतिगृह अधीक्षक यासारखी संवर्गनिहाय अत्यावश्यक पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, (इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय) पुणे यांनी सादर केला असून त्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (२२-०८-२०२२) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२), (३), (४) व (५) स्वयंपाकी, मदतनिस, वसतिगृह अधीक्षक इत्यादी अत्यावश्यक संवर्गातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने पडताळणीअंती अतिरिक्त ठरलेल्या पदांच्या समायोजनाची स्थिती तपासून सुधारीत माहिती संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाकडून मागवून पदभरतीस मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे.

---

## तत्कालीन जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सोलापूर यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(७) १३७४९ (२७-०६-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर : तारांकित प्रश्न क्रमांक ११७५२ ला दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सोलापूर यांनी सोलापूर जिल्ह्यामध्ये कोयना, धोम, कन्हेर, वीर अशा विविध धरणग्रस्तांना जमिनी मंजूर करून त्या जमिनींची दलालामार्फत खरेदी-विक्री केल्याप्रकरणी गैरव्यवहाराची चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याबाबत RPI(A) चे पदाधिकारी श्री.दिपक चंदनशिवे यांनी आझाद मैदान, मुंबई येथे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केलेल्या आंदोलनाच्यावेळी दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन शासनाने दिले असून संबंधित दोषींवर कोणतीही कारवाई झालेली नसल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन पुनर्वसन अधिकारी, सोलापूर यांच्या गैरकारभाराची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी अनेक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.चंदनशिवे यांच्या निवेदनातील मुद्यांच्या अनुषंगाने तपासणी करण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयाकडुन चौकशी समिती नेमण्यात आली असून श्री.सखाराम हरी कदम यांना दुबार जमीन वाटप व श्री.वाडकर यांना पर्यायी जमीन वाटप आदेश या दोन्ही प्रकरणी वाटप आदेश रद्द करण्यात आले असून यासंदर्भात संबंधितांविरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली असून सदर चौकशी समितीने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) असल्यास, त्रुटींची पूर्तता करुन प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या पात्रतेनुसार तसेच श्री.व्यवहारे यांना पर्यायी जमीन वाटप संदर्भात जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे स्तरावर करण्यात आलेली अंतिम कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, तसेच तत्कालीन जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सोलापूर यांनी केलेल्या गैरकारभाराबाबत त्याच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०८-२०२२) :** (१), (२), (३) व (४) सोलापूर जिल्ह्यात विविध प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी वाटप करण्यात आलेल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी वाटपासंदर्भात श्री.दिपक चंदनशिवे यांनी दिलेल्या निवेदनातील मुद्यांच्या अनुषंगाने तपासणी करण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयाकडुन चौकशी समिती नेमण्यात आली होती. त्यानुसार सदर निवेदनातील एकूण ४ मुद्यांपैकी मुद्दा क्र. १ व ३ मध्ये सकृत दर्शनी तथ्यता दिसुन येत आहे. त्यामुळे मुद्दा क्रमांक १- श्री.सखाराम हरी कदम यांना दुबार जमीन वाटप व मुद्दा क्रमांक- ३ श्री.वाडकर यांना पर्यायी जमीन वाटप आदेश या दोन्ही प्रकरणी वाटप आदेश रद्द करण्यात आले असून यासंदर्भात संबंधितांविरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावित होती त्यानुसार तत्कालीन जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सोलापूर तसेच तत्कालीन मंडळ अधिकारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच मुद्दा क्र. ४- श्री.व्यवहारे यांना पर्यायी जमीन वाटप करणे प्रकरणी त्यांचे स्तरावरुन त्रुटी पुर्तता करण्यात आल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील जात पडताळणी कार्यालयातील प्रकरणे दलालांमार्फत करण्यात येत असल्याबाबत

**(८) १३७७२ (२७-०६-२०२२) श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात जात प्रमाणपत्र पडताळणीची प्रलंबित असलेली प्रकरणे पूर्ण करण्यासाठी लाच घेण्याचे प्रकार लाच लुचपत प्रतिबंध विभागाने केलेल्या कार्यवाहीमुळे निदर्शनास आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक, सेवा विषयक तसेच निवडणूक कामासाठी जात प्रमाणपत्र आवश्यक असल्याने ऑनलाइन अर्ज दाखल करूनही प्रत्यक्षात कार्यालयात येऊनच कागदपत्र जोडल्याशिवाय जात प्रमाणपत्र मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीसाठी ठेवण्यात आलेली प्रकरणे दलालांमार्फत मंजूर करण्यासाठीची साखळी कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अर्जदारास अनेकदा प्रकरणे अपूर्ण आहेत सांगून बाजूला ठेवली जातात तसेच चौकशीसाठी ठेवलेली प्रकरणे दलालामार्फत मंजूर करून घेत असल्याने सामान्य नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जात पडताळणी कार्यालय दलाल मुक्त करण्यासाठी कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सद्याच्या कार्यप्रणालीनुसार ऑनलाईन अर्ज दाखल केल्यानंतर ३० दिवसांच्या आत सदर अर्जाची प्रिंट व इतर कागदपत्रे कार्यालयात येवून दाखल करणे आवश्यक आहे. जिल्हा जात पडताळणी समितीस दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये असलेल्या न्याय चौकशी अधिकारानुसार उमेदवाराने मूळ कागदपत्रे दाखविणे आवश्यक आहे.

(३), (४), (५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेसाठी (टीआरटीआय) स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्याबाबत

**(९) १३८२१ (२७-०६-२०२२) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी स्थापन करण्यात आलेल्या आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेसाठी (टीआरटीआय) अद्यापही स्वतंत्र आर्थिक तरतूद नसल्याने या स्वायत्त संस्थेला स्वतंत्र उपक्रम राबविण्याकरीता मंत्रिमंडळ आणि वित्त विभागाची मंजुरी घ्यावी लागत असून संशोधन करणाऱ्या अनुसुचित जमातींच्या विद्यार्थ्यांकरीता अधिछात्रावृत्ती देण्याबाबतचा निर्णयही घेता येत नसल्यामुळे आदिवासी विद्यार्थी संशोधनापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी संस्थेची मूळ उद्दिष्ट व व्याप्ती वाढवून स्वायत्ता दर्जा मिळावा याकरिता शासनाने दिनांक २४ डिसेंबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास शासन निर्णय निर्गमित केला तसेच आदिवासींच्या विकासासाठी ११ हजार कोटींची तरतूद करण्यात येऊनही आदिवासी विकास खात्यामार्फत सदर संस्थेला कोणतीही आर्थिक मदत मिळाली नसल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील नामांकीत विद्यापीठात किमान ५०० आदिवासी विद्यार्थी संशोधन करत असून आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडून अधिछात्रवृत्ती मिळत नसल्यामुळे उद्भवणाऱ्या आर्थिक समस्यांमुळे कार्यसंशोधन करणारे (पीएचडी) विद्यार्थी प्रकल्प अपूर्ण सोडत आहेत तसेच अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर केंद्रीय आदिवासी संचालनालयाच्या वतीने अधिछात्रवृत्ती दिली जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास "टीआरटीआय" मार्फत संशोधन करणाऱ्या अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना संशोधन करण्यास प्रोत्साहन मिळावे याकरीता अधिछात्रवृत्ती देण्यात यावी अशा आशयाच्या मागणीची लेखी निवेदने लोकप्रतिनिधींनी शासनाकडे सादर केली आहेत तसेच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पूणे यांनी सदर प्रकरणी शासनास दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास प्रस्ताव सादर केला असून सदर प्रस्ताव मान्य करण्याच्या दृष्टीने शासनाने निर्णयात्मक कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१९-०८-२०२२) :** (१), (२), (३) व (४) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य व केंद्र योजनांतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून संबंधित योजनांचा खर्च भागविण्यात येतो.

जनजाती कार्य मंत्रालय भारत सरकार यांच्या मार्फत दरवर्षी अनुसुचित जमातीच्या १८०० उमेदवारांना पी. एच. डी. करण्यासाठी अभिछात्रवृत्ती देण्यात येते.

राज्यस्तरावरुन अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना अभिछात्रवृत्ती देणे, ही नवीन योजना प्रस्तावित असून सदर योजनेस मान्यता देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महानिर्मिती व महावितरण कंपनीकडे कोट्यवधी रकमेची थकबाकी प्रलंबित असल्याबाबत

**(१०) १३८४३ (२७-०६-२०२२) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या महानिर्मिती या वीज उत्पादन करणाऱ्या कंपनीकडे कोल इंडियाची अंदाजे २ हजार ३९० कोटी रुपयांची थकबाकी असून कोळसा खरेदी करण्याकरीता महानिर्मितीने सदर रक्कम कोल इंडियाला अद्याप दिली नसल्याची बाब माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास महानिर्मितीची औष्णिक वीज उत्पादन क्षमता नऊ हजार कोटी असूनही कंपनी सहा हजार मेगावॅट निर्मिती करीत असून कोल इंडियाला कोळसा खरेदीपोटी पैसे दिले नसल्याने कोळसा टंचाईचे संकट निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महावितरणकडून महिनाभराचे वीज देयक थकल्यानंतर सामान्य ग्राहकांचा वीजपुरवठा तोडला जात असल्याचे निदर्शनास येते परंतु राज्य शासनाच्या विविध विभागांकडे महावितरणची कोट्यवधी रुपयांची थकबाकी असून ती तात्काळ वसूल करून पूर्ण क्षमतेने वीज निर्मिती होण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने भारनियमन टाळण्यासाठी व विजेचे संकट दूर होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.

वीज निर्मिती करण्याकरीता कोल इंडिया कडून कोळसा खरेदी प्रक्रिया इंधन खरेदी करारानुसार सुरु आहे. कोल इंडिया लि. च्या अधिनस्त असलेल्या कोळसा कंपन्यांना कोळसा पुरवठ्याची दिनांक ३१/०५/२०२२ पर्यंत निर्विवादित (Un-disputed) थकबाकी रुपये ७७१.३६ कोटी इतकी रक्कम महानिर्मिती कंपनीकडून देय आहे. तसेच, कोल इंडिया लि. च्या अधिनस्त असलेल्या कोळसा कंपन्यांकडून होणाऱ्या अपुरा कोळसा पुरवठा, कोळशांमध्ये दगड पुरवठा, वाहतूक दावे, कोळशाची गुणवत्ता, अंडर लोडिंग, ओव्हर लोडिंग, दर्जा घसारा इ. बाबतचे रुपये ७१८१.६६ कोटीचे विवादीत (disputed) दावे (claims) कोळसा कंपन्यांकडून महानिर्मिती कंपनीस येणे आहे. तर, कोल इंडिया लि. यांच्यानुसार रुपये ३१६३.१५ कोटी इतकी विवादीत (disputed) कोळसा पुरवठ्याचे देयक मागणी आहे.
(२) हे खरे नाही.
(३) राज्य शासनाच्या विविध विभागांकडून सुमारे रुपये ९३३६/- कोटी थकबाकी आहे. सदर थकबाकी वसूली करण्यासाठी शासनाच्या विविध विभागांकडे महावितरण कंपनीकडुन नियमितपणे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) भारनियमन टाळण्यासाठी वीजेच्या उच्चतम मागणी कालावधीत शक्य तितक्या अधिक क्षमतेने औष्णिक व जलविद्युत निर्मिती करणे, तसेच खुल्या बाजारातुन आवश्यकतेनुसार वीज खरेदी करणे इत्यादी उपाययोजना करण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपाना नियमितपणे वीजपुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(११) १३८८९ (२७-०६-२०२२) डॉ.रणजित पाटील, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, अमरावती या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या कृषीपंपाना तसेच करडी, मुंढरी, पोलोरा (ता.मोहाडी, जि.भंडारा) परिसरातील कृषीपंपाना आठ तास वीज पुरवठा करण्याऐवजी केवळ दोन ते तीन तास वीज पुरवठा करण्यात येत असल्यामुळे रब्बी पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे नुकसान होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्वी (ता.जि.वर्धा) येथील शेतकऱ्यांनी शासनाच्या सन २०२० च्या कृषी विषयक धोरणांतर्गत २७९ शेतकऱ्यांनी कृषी पंपाना विज पुरवठा करण्याकरिता अर्ज करूनही अद्याप १२५ शेतकऱ्यांच्या पंपाना विज कनेक्शन देण्यांत आले नसल्याचे दिनांक २५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतीसाठी विहिरीत मुबलक प्रमाणात पाणी असूनही भारनियमनामुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, अमरावती, वर्धा या जिल्ह्यांसह करडी, मुंढरी, पोलोरा (ता.मोहाडी, जि.भंडारा) परिसरातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना नियमित वीज पुरवठा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०८-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

संपूर्ण राज्यात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार शेतीकरिता रात्री ८ तास किंवा दिवसा ८ तास असा थ्री फेज वीज पुरवठा चक्राकार पध्दतीने देण्यात येत आहे. तथापि, माहे मे, २०२२ मध्ये भंडारा जिल्ह्यातील मोहाडा तालुक्यातील मोहगाव येथील विद्युत वाहिन्यांवर तांत्रिक बिघाडामुळे काही दिवस वीज पुरवठा खंडीत झाला होता. तसेच दिनांक ११/०५/२०२२ रोजी २२० के.व्ही. पारेषण प्रणालीमध्ये तांत्रिक बिघाडामुळे ११ के.व्ही. कोका कृषी व ११ के.व्ही. माहेगांव या वाहिन्यांवर आपात्कालिन भारनियमन करावे लागले होते.

(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

आर्वी तालुक्यामध्ये कृषी वीज पंप जोडणी धोरण-२०२० अंतर्गत दिनांक ०४/०४/२०१८ पासून पैसै भरुन प्रलंबित असलेल्या ८८६ कृषी अर्जदारांपैकी ४३५ कृषी पंपाना वीज जोडणी देण्यात आल्या आहेत. उर्वरित वीज जोडणीची कामे कृषी आकस्मिक निधी व उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येत आहेत. मे, २०२२ अखेर ४५१ वीज जोडण्या पैसे भरुन प्रलंबित आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(१२) १३९३१ (२८-०६-२०२२) श्री.सुरेश धस : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १४ मधील प्रश्न क्रमांक ९८३० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्मदाय आयुक्त कार्यालयामार्फत नोंदणीकृत असलेल्या आदिवासी सशक्तीकरण आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे मध्ये ७५ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असल्याचे तसेच दिनांक १ जानेवारी, २०१८ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीत राबविण्यात आलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षण प्रकल्पामध्ये ७० कोटींचा भ्रष्टाचार झाला असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास विभागातील १५० कोटी रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून दिनांक १ जानेवारी, २०१८ ते ३१ डिसेंबर, २०२० या कालावधी दरम्यान राबविण्यात आलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षणाबाबतचा सविस्तर वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात आला असून सदर अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सविस्तर वस्तुस्थितीदर्शक अहवाल प्राप्त होण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, सदर सविस्तर वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास तात्काळ प्राप्त होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(५) असल्यास, प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने आदिवासी विभागातील सुमारे १५० कोटी रुपयाच्या भ्रष्टाचाराप्रकरणी तत्कालीन आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या (TRTI) आयुक्तांची सखोल चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई होऊन जमीन महसूलाप्रमाणे भ्रष्टाचाराची रक्कम वसूल करण्यासाठी शासनस्तरावर कोणतीही कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१९-०८-२०२२) :** (१), (२), (३) मा.श्री.सुरेश धस, वि. प. स. यांचे दिनांक ८ एप्रिल, २०२१ रोजीचे सदर विषयाबाबतचे मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना संबोधून लिहिलेले निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे.

सदर प्रकरणी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून मागविण्यात आलेला अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सामाजिक न्याय विभागांतर्गत राजर्षी शाहू महाराज परदेशी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना मिळण्याबाबत

**(१३) १३९३२ (२८-०६-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.जयंत आसगावकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती आणि नवबौध्द विद्यार्थ्यांकरीता सामाजिक न्याय विभागांतर्गत राजश्री शाहू महाराज विदेशी शिष्यवृत्ती योजना सन २००३ मध्ये सुरु करण्यात आली असून सदर योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना मिळत नसून माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडून अर्ज मागविले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे ७५ विद्यार्थी प्रवेशापासून वंचित असून विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये दरवर्षी वाढ होत असल्यामुळे सन २०२२ पासून ५० जागांमध्ये वाढ करण्याची घोषणा शासनाने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाप्रमाणे प्रचलित शिक्षण शुल्क प्रतिपूर्ति योजना वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरु ठेवण्यात यावी तसेच, या योजनेच्या अंमलबजावणीस दरवर्षी मंत्रीमंडळाची मान्यता न घेता धोरण म्हणुन मंजुरी देण्यात यावी या निर्णयांची अंमलबजावणी होत नसल्याने ही योजना सन २०१७-१८ पासून बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर योजना कार्यान्वित करुन अनुसुचित जातीतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना परराज्यात उच्च शिक्षण घेता यावे यासाठी शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना प्रभावीपणे राविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) मा.मंत्री (सा.न्या) यांनी दिनांक ०५/०८/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत परदेश शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ५० जागा वाढविण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बेलोशी, वळवली (ता.अलिबाग, जि.रायगड) परिसरात आंब्याच्या बागेला लागलेल्या आगीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळण्याबाबत

**(१४) १३९५९ (२७-०६-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलोशी, वळवली (ता.अलिबाग, जि.रायगड) परिसरात माळरानावर वळवली येथील १० एकरहून अधिक जागेत असलेल्या आंब्याच्या बागेला दिनांक २५ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास अचानक लागलेल्या आगीमुळे वळवली गावातील सुमारे १० ते १५ शेतकऱ्यांचे लाखो रूपयाचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आगीमुळे नुकसान झालेल्या आंब्याच्या झाडाना पुन्हा फळ येण्याची शक्यता नसल्याने ही झाडे नापीक होण्याची भीती असून बागायतदार शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नुकसानग्रस्त बागायतदार शेतकऱ्यांनी संबंधित विभागाकडे नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी केली असूनही पंचनामे अद्याप करण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने शासनाकडून संबंधित नुकसानग्रस्त बागायतदार शेतकऱ्यांना भरपाई देण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे व पंचनामे वेळेवर न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०८-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे,

दिनांक २१/०४/२०२१ रोजी लागलेल्या आगीमुळे ८ शेतकऱ्यांचे एकूण ४.१७ एकर क्षेत्रफळाचे नुकसान झाले आहे.
(२) खरे नाही.
(३) खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषानुसार आगीमध्ये मृत झालेल्या व्यक्तींच्या वारसदारांना व घरांच्या नुकसानीकरीता आर्थिक मदत देण्यात येते. सदर घटनेमध्ये कोणतीही जिवीत हानी अथवा घराचे नुकसान झालेले नाही. तसेच आगीमुळे आंब्याच्या बागांच्या झालेल्या नुकसानीकरीता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषानुसार मदत देय ठरत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेणसह इतर तालुक्यातील खारबंदिस्त बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१५) १३९६४ (२७-०६-२०२२) श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १२२०३ ला दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील (ता.अलिबाग) समुद्र संरक्षक बांधांचे २० वर्षांपासून नुतनीकरण न केल्यामुळे बांधच शिल्लक राहीलेले नसून परिणामी दर महिन्याच्या अमावस्या व पौर्णिमेला दर १५ दिवसांनी गावात सागरी उधाणाचे खारेपाणी शिरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उधाणाच्या खाऱ्या पाण्यामुळे सदर परिसरातील भातपिकांचे नुकसान, गोड्या पाण्याच्या विहीरीतील पाणी खारे होणे, जमिनी अतीक्षारयुक्त होणे, मिठागरे नाश पावणे, समुद्रातील मासे वाहून जाण्याचे प्रमाण वाढणे, खारे पाणी शिरल्याने नारळाची झाडे मृत होणे तसेच घरांच्या भिंतीत खारे पाणी जाऊन घरांचे नुकसान होणे इ. अनेक समस्यांना सदर परिसरातील नागरीकांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील समुद्र संरक्षक बांधांचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना अथवा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-०८-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

खारभूमी विकास मंडळांतर्गत रायगड जिल्ह्यात एकूण १६५ योजना असून १३५ योजनांची कामे पूर्ण झालेली आहेत. त्यापैकी अलिबाग तालुक्यात ३६ योजना असून ३४ योजनांची कामे पूर्ण झालेली आहेत.

सततची उधाणे व अतिवृष्टी यामुळे योजना कमकुवत झाल्या आहेत. अलिबाग तालुक्यातील या ३६ योजनांपैकी २६ योजनांची कामे करुन १५ वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाला आहे. या योजना कमकुवत झाल्याने मोठ्या उधाणांच्या वेळी खांडी जाऊन उधाणाचे पाणी शेतीत शिरण्याची शक्यता निर्माण होत आहे.

(२) होय. अंशत: खरे आहे.

(३) खारभूमी योजनेतील क्षेत्राचे संरक्षण करण्यासाठी ज्या ठिकाणी उधाणामुळे खांडी पडतात ती कामे प्रापणसूचीमध्ये समाविष्ट करुन २४०२ विस्तार व सुधारणा या लेखाशिर्षांतर्गत केली जातात. जेणे करुन शेतीचे व इतर मालमत्तेचे संरक्षण होईल.

कायम स्वरुपी उपाय योजना म्हणून खारभूमी योजनांच्या नुतनीकरणाची कामे हाती घेण्यात येत आहेत. सन २०२२-२३ मध्ये रायगड जिल्ह्यातील ९ योजनांची नुतनीकरणाची कामे प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे ३०३९ हेक्टर क्षेत्र संरक्षित होणार आहे. तसेच सन २०२२-२३ मध्ये ४० खारभूमी योजनांच्या नुतनीकरणाची कामे नियोजित असून सदर अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असून निधीच्या उपलब्धतेनुसार कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वढाव बोर्झे (ता.पेण, जि.रायगड) या खारेपाट भागातील खारबंदिस्त बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१६) १३९६६ (२७-०६-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वढाव बोर्झे (ता.पेण, जि.रायगड) येथील खारबंदिस्तीला तडा जावून खारेपाटातील शेकडो एकर जमीन पाण्याखाली जाऊन नापीक बनली असून सदर बंदिस्तीच्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत शेतकऱ्यांनी

खारभूमी विभागाकडे पत्रव्यवहाराद्वारे तक्रार केली असून उक्त तक्रारीची दखल शासनाने घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेण तालुक्यातील गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत असून आंबेत (ता.म्हसळा, जि.रायगड) खाडीवरील बंधाऱ्याला भगदाड पडल्याने लिपणी वावे, खारगाव, आमशेत, लिपणी वावे मोहल्ला, बौध्दवाडी येथील सुमारे ३०० एकर भातशेतीत खारे पाणी शिरल्यामुळे भातशेतीच्या झालेल्या नुकसानीची अद्याप शेतकऱ्यांना भरपाई मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पेण तालुक्यातील खारभूमी बंदिस्तीच्या नुतनीकरणाच्या कामाची निविदा प्रक्रिया पार पडून ४० महिन्यांहून अधिक कालावधी होऊनही कंत्राटदारामार्फत सदर काम अपुरे व निकृष्ट दर्जाचे झाले असून संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पेण तालुक्यांतील खारेपाट भागांतील अपुऱ्या अवस्थेत असलेल्या वढाव बोर्झे या बंधाऱ्यासह इतर बंधाऱ्यांच्या दुरुस्तीचे व नुतनीकरणाचे काम तात्काळ सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.

वढाव बोर्झे या बोर्डकालीन योजनेचे काम सन १९५३ मध्ये पूर्ण करण्यात आले असून सदर योजनेचे नुतनीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. या योजनेच्या सा. क्र. १७०५ मी. ते १७२० मी. या दरम्यान माहे डिसेंबर, २०२१ च्या उधानात खांड गेली होती व त्यामुळे खारे पाणी प्रापण क्षेत्रात शिरले होते. सदर खांड त्वरित बांधून घेवून पाणी प्रापण क्षेत्रात शिरणार नाही याची दक्षता घेतली आहे.

सदर बंदिस्तीचे काम निकृष्ट झाल्याबाबत शेतकऱ्यांनी खारभूमी विकास विभागाकडे पत्रव्यवहार केला आहे. खारभूमी योजनांची कामे करताना शासनाच्या २०१३ च्या मानांकाप्रमाणे केली जात असल्याने हे खरे नाही.

(२) पिण्याचा पाण्याची टंचाई हा विषय या विभागाशी संबंधित नाही.

प्रश्नात नमूद केलेल्या रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यातील लिपणीवावे, खारगांव, आमशेत, लिपणीवावे मोहल्ला, बौध्दवाडी या भागात आंबेत खाडीवर बानुमरियम योजना असून जुलै, २०२१ च्या आलेल्या पुरात सदर योजनेस खांड गेली होती. सदर खांडीची दुरुस्ती सन २०२१-२२ मध्ये करण्यात आली आहे. भातशेती पिकाचे लिपणी वावे, खारगांव, आमशेत येथील शेतकऱ्यांचे पंचनामे करुन नुकसान भरपाई अदा करण्यात आली असल्याचे तहसिलदार, म्हसळा व तालुका कृषी अधिकारी, म्हसळा-रायगड यांनी कळविले आहे.

(३) वढाव बोर्झे खारभूमी योजनेचे नुतनीकरणाचे कामास दिनांक २४/०९/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. परंतु कंत्राटदाराने कामाची योग्य ती प्रगती राखली नाही. वढाव बोर्झे खारभूमी योजनेच्या कंत्राटदारास योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत वारंवार लेखी व तोंडी कळवूनही योजनेचे काम न केल्यामुळे कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्याचे प्रस्तावित होते. तथापि, दिनांक ०७/०१/२०२२ रोजी पेण खारेपाट विकास संकल्प संघटनेचे प्रतिनिधी यांचेसोबत बैठक झाली. त्यानुसार कलम १५ खाली सदर काम विखंडीत करण्याबाबत निर्देश दिल्यानुसार कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) कलम १५ खाली सदर काम कंत्राटदाराकडून काढून घेण्याची विभागाने कार्यवाही सुरु केली आहे. त्यानुसार विभागामार्फत समिती नेमून सदर योजनेची संयुक्त मोजणी करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित कामासाठी सुधारित अंदाजपत्रक तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असून त्यास मंजूरी देऊन नुतनीकरणाचे काम सन २०२२-२३ मध्ये उपलब्ध अनुदानाच्या अनुषंगाने हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हास नदीवरील आपटी बंधाऱ्याची दुरूस्ती करण्याबाबत

**(१७) १३९७१ (२८-०६-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील उल्हास नदीवरील आपटी बंधाऱ्याचा स्लॅब कोसळला असून तेथील नागरिक लोखंडी अँगलवरून धोकादायक प्रवास करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दहा गावांचे दळण वळणाचे साधन असलेला हा बंधारा दीड मीटर रूंदीचा असून परिसरातील नागरिकांना आपला जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असून सदर बंधाऱ्याची दुरूस्ती करण्यात यावी यासाठी तहसिलदार, कल्याण यांचेकडे तेथील ग्रामस्थांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उल्हास नदीवरील आपटी बंधाऱ्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच, सदर बंधाऱ्याचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१९-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

म.औ. वि. महामंडळाने मौजे जांभूळ व वसत गावाजवळ बारवी पाणीपुरवठा योजनेंतर्गत उल्हास नदीच्या किनाऱ्यावर मौजे वसत येथे उदंचन केंद्र बांधले आहे व त्यासाठी लागणारे पाणी अडविण्याकरीता उल्हास नदीवर बंधारा बांधला आहे. त्या बंधाऱ्यावरुन वाहणाऱ्या पाण्याच्या वेगाच्या उर्जेमुळे बंधाऱ्याच्या पायास नुकसान होऊ नये म्हणून उर्जेचा क्षय होण्यासाठी बंधाऱ्याचाच भाग म्हणून स्टीलींग बेसीन बांधले असून, तो छोटा बांध आहे. ज्याचा वापर त्यावर पाणी नसताना व कधी कधी पाणी असताना सुध्दा आजूबाजूचे लोक नदी पार करण्याकरीता अनधिकृतरित्या करत असतात. दोन वर्षापुर्वी या छोटया बांधाचा काही भाग पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने जवळच्या गावातील लोकांनी त्यावर लोखंडी चॅनेल टाकून नदी पार करण्यासाठी सदरील बांधाचा वापर करीत आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) बंधाऱ्याचा उपयोग जवळच्या गावातील लोक अनधिकृतपणे करीत असल्याने सदर बंधाऱ्याचा वापर करु नये या करीता म.औ.वि.महामंडळातर्फे सुचना फलक लावण्यात आले असून, बंधाऱ्याच्या दुरुस्तीबाबत प्रस्ताव मंजुरीच्या प्रक्रीयेत आहे. मंजुरी प्राप्त झाल्यानंतर दुरुस्तीचे काम सहा महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शुल्क फी समाजकल्याण विभागाकडून नियोजित वेळेत अदा होत नसल्याबाबत

**(१८) १४०२५ (२७-०६-२०२२) श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अभियांत्रिकी महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शुल्क फी ही समाज कल्याण विभागामार्फत दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शुल्क फी विहित कालावधीत महाविद्यालयास अदा करण्यात आली नसल्यास महाविद्यालय विद्यार्थ्यांची अडवणूक करीत असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शुल्क फी समाज कल्याण विभागाने नियोजित वेळेत देऊन विद्यार्थ्यांची महाविद्यालयाकडून होणारी अडवणूक रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) याबाबत विभागामार्फत वेळोवेळी निर्गमित झालेले शासन निर्णय व परिपत्रकांव्दारे महाविद्यालयांना या प्रकारचे कोणतीही आडवणूक करु नये याबाबतच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. तसेच याबाबत तक्रारी प्राप्त होत असल्याचे निदर्शनास आल्याने, समाज कल्याण आयुक्तालयामार्फत राज्यातील सर्व विद्यापीठांना त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांमध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी यांची अडवणूक अथवा पिळवणूक होत असल्यास संबंधित कुलगुरुंनी अशा महाविद्यालयांच्या प्राचार्यावर तसेच महाविद्यालयांवर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (TRTI) पुणे येथे आर्थिक गैरव्यवहारात दोषी असलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्याबाबत

**(१९) १४०३४ (२८-०६-२०२२) श्री.सुरेश धस : तारांकित प्रश्न क्रमांक १२१५७ ला दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागातील रुपये १०,५०० पेक्षा अधिक कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराबाबत मा.आदिवासी विकास मंत्र्यांनी सभागृहात दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी तसेच दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी दिलेले लेखी उत्तर पूर्णपणे खोटे व सभागृहाची दिशाभुल करणारे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात आदिवासी विकास विभागातील कथीत १०,५०० पेक्षा अधिक कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराबाबत शासन

स्तरावरून नेमलेल्या निवृत्त न्यायमूर्ती श्री.गायकवाड समितीने दोषी ठरवलेल्या व दोन वेळा FIR झालेल्या श्री.इ.जी.भालेराव यांना सेवानिवृत्तीनंतरही सहआयुक्त या पदावर तीन वर्षे मानधनावर कार्यरत ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी श्री.भालेराव यांना सन २०१७ पासून अद्यापपर्यंत सेवानिवृत्तीनंतरही नियुक्ती देण्यात येऊन त्यांना मानधनही देण्यात येत असून आर्थिक गैरव्यवहारात दोषी असताना तसेच सेवानिवृत्त होवुनही तीन वर्षानंतर शासनाच्या परवानगीशिवाय मानधनावर ठेवता येत नाही असे असतानाही निवृत्त दोषी अधिकाऱ्याची शासनाची कोणतीही परवानगी न घेता परत मानधनावर नियुक्ती करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यांच्या पूर्वग्रहदूषित कामकाजातील हस्तक्षेपाने त्यांना तेथुन काढण्यासाठी आदिवासी विभागाच्या कर्मचाऱ्यांमध्ये व संपूर्ण आदिवासी समाजामध्ये तीव्र असंतोष असतानाही जाणीवपूर्वक, हेतुपुरस्सर, पूर्वग्रहदूषित त्यांना शासनाकडून पाठीशी घातले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर प्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली, वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१६-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांना कंत्राटी तत्वावर नियुक्ती देण्याबाबत शासनाच्या प्रचलित नियमानुसार आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या कार्यालयात कामाच्या आवश्यकतेनुसार सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांना नियुक्ती देण्यात आली असून त्यांना नियमानुसार देय मानधन अदा करण्यात येते.

तदनुसार, श्री.भालेराव यांना कंत्राटी तत्वावर आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे येथे सल्लागार (संशोधन) या पदावर नियुक्ती देण्यात आली आहे.
(४) कार्यालयीन कामकाजाच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष व रोष असल्याबाबत, लेखी तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महावितरणच्या अधिकाऱ्यांनी वसई विभागातील तीन उद्योगांना अनधिकृत लाभ देऊन केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२०) १४०४८ (२७-०६-२०२२) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरणच्या अधिकाऱ्यांनी वसई विभागातील तीन उद्योगांना ६ कोटी २१ लाख एवढया रक्कमेचा अनधिकृत लाभ दिला असून यासंदर्भात तक्रार करण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उद्योगांमध्ये गार्डीयन ग्रुप, सुर्या ग्रुप व जयदीप ग्रुपचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसई विभागाचे तत्कालीन अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता (प्रशासन), वरिष्ठ व्यवस्थापक व प्रोग्रॅमर (आयटी) यांनी सदर गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जबाबदार असणाऱ्या संबंधितावर कारवाई होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे.

सदर प्रकरणी दिनांक १०/०४/२०२२ रोजी ई-मेलद्वारे महावितरण कंपनीच्या वसई मंडळ कार्यालयास तक्रार प्राप्त झालेली आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात येत असून, चौकशीअंती नियमबाह्य बाब व गैरव्यवहार आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.